# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक २४/०९/२०२२ (शनिवार)**

**(दुपार)**

---

### फसवणुक

**पो.स्टे. काटोल** :— अंतर्गत ३ कि मी अंतरावर वल्लभविहार वाढोणा रोड काटोल येथे दिनांक २३.०९.२२ चे १२.३० ते १२.४५ वा. दरम्यान फिर्यादी नामे— सौ.नर्मदाबाई साहेबराव खेडकर वय ६१ वर्ष रा. वल्लभविहार वाढोणा हिचे घरा समोर दोन अज्ञात आरोपी वय अंदाजे २५ ते ३० वर्ष यांनी सोन्याचे दागीने पॉलीश करून देतो असे म्हणुन फिर्यादीचे कानातील सोन्याचे टॉप्स वजन साडे तिन ग्रम कि. १५,०००/—रू. चे घेवुन चोरून फसवणुक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ४१७, ४१९, ४२०, ३४ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि जवाहर चव्हाण मो.न.९५४५३६३१२१ हे करीत आहे.

### अपघातात मृत्यु

**१) पो.स्टे. खापरखेडा** :— अंतर्गत ०७ कि. मी. अंतरावरील मौजा दहेगाव शिवार येथे दिनांक २३/०९/२२ चे ०९.०० वा. ते ०९.१० वा. सुमारास एम.एच—४०/बी.जे—८१३९ क्रमांकाचा क्रेन चा चालक आरोपी नामे— नाना वामन सहारे वय ३६ वर्षे रा.वाकोडी ता.सावनेर याने त्याचे ताब्यातील क्रेन(हायड्रा) ने प्रतिभा लक्ष्मीनारायण शुक्ला (मृतक), वय ६० वर्ष, रा.दहेगाव रंगारी हिला धडक दिली. या अपघातात ती गंभीर जखमी झाल्याने तिचा जागीच मृत्यु झाला. सदर गाडी चालक हा सदर मृत महीलेस घटना स्थळावर मृत अवस्थेत सोडुन पळुन गेला.

सदर प्रकरणी सरतर्फे पोउपनि जानुसिग जाधव पो.स्टे.खापरखेडा यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम ३०४ अ, २७९ भादवी सहकलम १३४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला सुचनापत्रावर सोडण्यात आले असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि जानुसिंग जाधव मो.नं. ९७६४४०१२४६ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. जलालखेडा** :— अंतर्गत १० कि. मी. अंतरावरील येथे दिनांक २१/०९/२२ चे ०४.३० वा. ते ०४.४५ वा. सुमारास नथ्थुजी भाउरावजी घीमे(मृतक), वय ७५ वर्ष, रा. कांरजा वार्ड नं. १५ ता.कारंजा जि. वर्धा हे पारडसिंगा येथे सती अनुसया माता देवस्थान पारडसिंगा येथे पायदळ दर्शनाकरीता जात असतांना अज्ञात वाहन चालक आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन निष्काळजीपणे व हयगयीने चालुवन रोहणा ते कापरी कने गावाचे मधात नायगाव धोटे शिवारात सिमेंट रोडवर मृतक यांना धडक दिली. आरोपी हा कुठलीही मदत न करता व माहीती न देता घटना स्थळावरुन आपले वाहन घेवुन पळुन गेला. मृतक याचे डोक्याला, डोळ्याला, दोन्ही पायाला व तोंडाला गंभीर दुखापत झाल्याने त्यांना उपचाराकामी ग्रामीण रुग्णालय काटोल येथे नेले व पुढील उपचार कामी मेडीकल कॉलेज नागपुर येथे नेले असता डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले. सदरचे प्रकरणाची मर्ग डायरी क्र. ००/२२ ही मेडीकल कॉलेज नागपुर येथुन पो.स्टे. जलालखेडा येथे प्राप्त झाल्याने सदरचा गुन्हा नोंद करुन तपासात घेतला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— सुरेश नथ्थुजी भाउरावजी घीमे, वय ३७ वर्ष, रा. कांरजा वार्ड नं. १५ ता. कारंजा जि. वर्धा यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३०४ अ भादवी

सहकलम १८४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार अनिल जोशी मो क्र. ७४९९७६०७२८ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**